१) सम्राट चंद्रगुप्त पहिला :-

गुप्त घराण्याची स्थापना श्रीगुप्ताने केली. त्यानंतर घटोत्कच गादीवर आला. नंतर चंद्रगुप्त पहिला गादीवर आला.चंद्रगुप्त पहिल्याचा कालखंड ३२० ते ३३५ असा होता. चंद्रगुप्त पहिला याने लिच्छवी घराण्याची राजकन्या कुमारदेवी हिच्याशी विवाह केला.यामुळे मगध प्रांतावर चंद्रगुप्त पहिल्याचे वर्चस्व प्राप्त झाले.चंद्रगुप्त पहिला याने उत्तर प्रदेशचा काही भाग आणि बंगालचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला. पुढे आयोध्या, प्रयाग हे प्रदेशही समाविष्ट केले. त्याने घ्महाराजाधिराजङ्ही पदवी घेतली.चंद्रगुप्त पहिला यांने गुप्तसंवत सुरु केले.

सम्राट समुद्रगुप्त (इ.स.पू.३३५ ते ३७५) :-

१) राज्यारोहण :-

समुद्रगुप्त हा चंद्रगुप्त पहिला आणि कुमारदेवी याचा पुत्र होय.सम्रद्रगुप्ताने गुप्त राज्याचे साम्राज्यामध्ये रुपांतर केले.सर्वात मोठा असल्यामुळे चंद्रगुप्त पहिला याने समुद्रगुप्तास युवराज म्हणून घोषीत केले होते.कुशाग्र बुध्दीमत्तेच्या समुद्रगुप्ताने विविध शास्त्रांचे आणि लष्करी शिक्षण पूर्ण केले.इ.स. ३३५ मध्ये समुद्रगुप्त सम्राटपदी आरूढ झाला. त्याने साम्राज्यविस्ताराची घोषणा केली आणि साम्राज्य विस्तार सुरु केला.

अ) उत्तर भारतावरील मोहिम आणि विजय :-

साम्राज्यविस्तारासाठी समुद्रगुप्ताने उत्तर भारतावर मोहिम आखली.नागवंशाचे तीन नागराजे,पद्मावती चा अच्युतनाग, मथुरेच नागसेन व गणपती नाग या तीन नागराज्यांचा पराभव समुद्रगुप्ताने केला आणि मोठ्या प्रमाणावर प्रदेश आपल्या साम्राज्यास जोडला.

ब) दक्षिण भारतावरील मोहिम आणि विजय :-

उत्तर भारतावरील विजया नंतर समुद्रगुप्ताने दक्षिण भारतावर मोहिम काढली.त्या मोहिमेत समुद्र-गुप्ताने दक्षिणेतील राज्याचा पराभव केला.हे पुढील प्रमाणे आहेत.

| | राज्य | राजा |
|---|---|---|
| १ | कोसल | महेंद्र |
| २ | अवमुक्त | मंटराज |
| ३ | महाकांतार | व्याघ्रराज |
| ४ | पिष्ठपूर | महेंद्रगिरी |
| ५ | ऐरंडपल | दमण |
| ६ | कोट्टूर | स्वामी दत्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | कांची | विष्णू गोप |
| ८ | कोरल | निलराज |
| ९ | पालक | उग्रसेन |
| १० | वेंगी | काकुस्थवर्मन |
| ११ | देवराष्ट्र | कुबेर |
| १२ | कुष्टलपूर | धनंजय |

समुद्रगुप्ताने या बारा राजांचा पराभव आपल्या मोहिमेत केला.राज्याचा सर्व भूप्रदेश साम्राज्यात समाविष्ट न करता या राज्यांना मांडालिकत्व प्रदान केले. उत्तरे कडे अतीदुर असल्यामूळे या प्रदेशामध्ये भावी काळात बंडे होतील. म्हणून समुद्रागुलाने ही योजना आखली.

## २) आर्यावर्तावरील दुसरी मोहिम :-

समुद्रगुप्ताने पराभूत केलेल्या आर्यावर्तावरील तीन राजांत मनामध्ये समुद्रगुप्ता विषयी शत्रुत्व कायम होते.समुद्रगुप्त दक्षिण भारतातील मोहितेमध्ये व्यस्त आहे हे पाहुन इतर सहा राजांना बरोबर घेऊन. एकुण नऊ राजांचा एक संघ बनवला.समुद्रगुप्ताला हे कळताच त्याने दक्षिणेस आल्यावर या राजांना विरुद्ध मोहिम काढली आणि या नऊ राजांचा पराभव केला.

१) **रुद्रदेव :-** समुद्र गुप्ताचा उत्तरेकडील प्रदेश

२) **मातील :-** आर्य वृत्तावरील एक लहान राज्य

३) **गणपतीनाग :-** पद्मावती

४) **नागसेन :-** मथुरा

५) **नागदत्त :-** मथुरेचा शेजारील राज्य

६) **अच्चुतनाग :-** अन्हीछत्र

७) **चंद्रवर्मन :-** आर्यावृत्तावरील एक राजा

८) **बलवर्मन :-** आर्यावर्तावरील एक राजा

अशा प्रकारे दुस-या माहिमेत आर्यावर्तावरील नऊ राजाचा पराभव केला.

९) **नागराज :-** आर्यावर्तावरील एक राजा

## ३) पूर्व भारतावर वर्चस्व :-

उत्तर व दक्षिण भारतावर वर्चस्व निर्माण केल्यावर समुद्रगुप्ताने पूर्व भारताकडे लक्ष दिले आणि पूर्व भारतावर एक मोहिम आखली परंतू समुद्रगुप्ताने आक्रमण करण्यापूर्वीच

तेथील पाच राजांनी समुद्र गुप्ताचे मांडलिकत्व स्विकारले आणि खंडणी देण्याचे मान्य केले.

**१) समतट** :- जेसों जिल्ह्याचा प्रदेश

**२) कामरुप** :- ढाका जवळील प्रदेश

**३) दवाक** :- प्राचीन आसामचा भूप्रदेश

**४) कार्कसूर** :- हिमालयाचा पायथा

**५) नेपाळ** :- जयदेव

या पाच राजांची समुद्रगुप्ताचे सार्वभौमत्व स्विकारले.

**४) पश्चिम भारतावर वर्चस्व :-**

समुद्र गुप्ताने पश्चिम भारतावर मोहिम आणली. या मोहिमेत एकूण नऊ राजांनी समुद्र गुप्ताचे मांडलिकत्व स्विकारले आणि खंडणी देण्याचे कबूल केले ते पुढील प्रमाणे आहेत.

**१) मालव** :- राजस्थानचा अग्नेय भाग

**२) अर्जूनायन** :- आग्रा आणि मथुराचा पश्चिम भागात येते.

**३) यौधेय** :- राजपुतांना

**४) अभीर** :- झाशी आणि भिलसाचा प्रदेश

**५) मद्रक** :- रावी आणि चिनाव नदी दरम्यानचा प्रदेश

**६) प्रार्जून** :- पश्चिमे कडील एक राज्य

**७) सनकाणिक** :- प्रार्जूनच्या शेजारचे राज्य

**८) काक** :- उत्तर प्रदेश

**९) खारपारिक** :- मध्य भारतातील प्रदेश

उपरोक्त नऊ राजांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्विकारले.

**५) मांडलिक राजांविषयी धोरण :-**

समुद्रगुप्ताच्या साम्राज्यामध्ये मांडलिक राजाची संख्या जास्त होती. त्यांच्याबाबतीत समुद्रगुप्ताने विशिष्ठ धोरण अवलंबिले होती. त्याची वैशिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

**१) सर्वकारण** :- मांडलिक राज्यांनी विविध प्रकारचे कर देणे.

**२) सम्यकरण** :- समुद्र गुप्ताचा आदेशाचे पालन करणे.

**३) प्रणाम** :- समुद्र गुप्ता समोर नतमस्तक होणे.

**४) आगमन** :- विविध प्रसंगी सम्राटाच्या दरबारात उपस्थित राहणे

५) **खंडणी /नजराणे** :- समुद्रगुप्तास खंडणी किंवा नजराणे देणे.

**६) समुद्र गुप्ताचे परराष्ट्र धोरण :-**

**१) कुशान / शक :-** समुद्रगुप्ताचा काळात वायव्य भारतात आणि सौराष्ट्रात कुशान आणि शकांची राज्ये होती.या राजांनी समुद्रगुप्ताचे मोठेपण मान्य केले.

**२) सिलोन :-** सिलोनच्या राजाने उत्तर भारतात यात्रेंकरुसाठी महाबोधी संघराम बांधला आणि समुद्रगुप्ताशी मैत्री निर्माण केली.

**६) अश्वमेध यज्ञ :-**

आर्यावर्तावरील लष्करी मोहिमा यशस्वी केल्यावर दिग्विजयाचे, विजयाचे प्रतिक म्हणून अश्वमेध यज्ञ केला.या यज्ञाची नाणी आजही उपलब्ध आहेत. नाण्याच्या एका बाजूला अश्वमेध पराक्रम आणि दुसऱ्या बाजूला यज्ञविधी आणि अश्वाचे चित्र कोरले आहेत.

**८) वैदिक धर्माचा आश्रयदाताआणि पुरस्कर्ता :-**

पूर्वीचा गुप्त सम्राटाप्रमाणे समुद्रगुप्ताने वैदिक धर्माला राजाश्रय दिला होता.तो स्वतः विष्णू भक्त होता.विष्णूचे वाहन गरुड हे समुद्रगुप्ताने आपल्या साम्राज्याचे प्रतिक मानले होते.वैदिक धर्मातील देव, देवतांची नाणी समुद्रगुप्ताच्या काळात प्रचलित होती.वैष्णवपंथ भरभराटीस आला होता. इतर धर्मांच्या बाबतीत धर्मसहिष्णू धोरण स्विकारले होते.

**९) विद्या आणि कलाप्रेमी सम्राट :-**

समुद्रगुप्ताने अनेक विद्वानांना राजाश्रय दिला होता.समुद्रगुप्ताना स्वतःविव्दान आणि कलाप्रेमी सम्राट होता.तो स्वतः उत्तम विणावादन करीत असे. समुद्रगुप्ताने धनुर्धारी व विणावादन करणारे चित्र असलेली सुवर्ण नाणी प्रचलित केली.

**चंद्रगुप्त व्दितीय/ विक्रमादित्य (इ.स. ३७५ ते इ.स.४१५) :-**

**१) राज्याभिषेक :-** समुद्रगुप्ताने आपल्या हयातीतच चंद्रगुप्त व्दितीय यास युवराज म्हणून नेमले होते.इ.स.३७५ मध्ये चंद्रगुप्त व्दितीय हा गादीवर आला.इ.स.३८०मध्ये त्याने स्वतःचा राज्यभिषेक केला.

**२) साम्राज्य विस्तार :-**

**१) चंद्रगुप्त विक्रमादित्याचे वैवाहिक संबंध :-** आपले साम्राज्य सुरक्षित राहावे आणि त्यात वाढ व्हावी या साठी चंद्रगुप्त व्दितीयनेविशिष्ठ वैवाहिक संबध निर्माण केले.नागवंशीय राजकन्या कुबेरनागा हिच्याशी चंद्रगुप्त व्दितीयाने विवाह केला आपली कन्य प्रभावती गुप्त हिचा विवाह वाकाटक राजा रुद्रसेन व्दितीय यांच्याशी लावून दिला.कुंतल

देशाचा राजा काकुस्थवर्मन यांच्याशी वैवाहिक संबंध जोडून आपले साम्राज्य बळकट केले.

**२) शक सत्तेचे उच्चाटन :-** शकाच्या आक्रमणांमूळे भारताची वायव्य सरहद्द अस्थिर राहिलेली होती. भारतावर सत्ता गाजवणाऱ्या शकांच्या विरुध्द चंद्रगुप्त व्दितीयने व्यापक मोहिम आखली व विजय मिळवला. शक सत्तेचे कायमचे उच्चाटन चंद्रगुप्त व्दितीय याने केले.म्हणून इतिहासकार चंद्रगुप्त व्दितीयला घ्शकारीङ असे म्हणतात.

**३) कुशानांशी संघर्ष :-** गांधार परिसरात. कुशानाचे राज्य होते.चंद्रगुप्त विक्रमादित्याने कुशानाविरुध्द मोहिम काढली आणि त्यांना भारताबाहेर हुसकावून लावले.

**४) बंगालवर विजय :-** शक आणि कुशानांन विरुध्द मोहिमेत चंद्रगुप्त व्दितीय व्यस्त आहे हे पाहून बंगालच्या प्रांतपालाने बंड केले हे बंड चंद्रगुप्त व्दितीयने मोडून काढले.

**५) वायव्य भारतावरील मोहिम :-** हिंदू कुश पर्वता जवळ वाहिलीकांचे राज्य होते..चंद्रगुप्त विक्रमादित्याने वाहिलिकांविरुध्द मोहीम आखली आणि त्याचा पराभव केला.वाहिलीकांनी चंद्रगुप्त व्दितीय.याचे प्रभूत्व मान्य केले.

**६) दक्षिणपथावर विजय :-** समुद्रगुप्ताच्या काळांतील काही राजाने गुप्तांचे मांडलिकत्व स्विकारले होत. त्यातील काही राजानी हे मांडलिकत्व त्यागले होते. चंद्रगुप्त व्दितीय यांने माहिम काढली आणि त्यांना पुन्हा मांडलिकत्व स्विकारण्यास भाग पाडले.

**२) अश्वमेध यज्ञ :-**

समुद्रगुप्ताप्रमाणेच चंद्रगुप्त व्दितीय याने विजय मिळवून साम्राज्यात भर टाकली आणि विजयाचे प्रतिक म्हणून अश्वमेध यज्ञ केला.

**३) वैदिक धर्माचा पुरस्कर्ता, अभिमानी :-**

समुद्रगुप्ताप्रमाणेच चंद्रगुप्त व्दितीय याने वैदिक धर्माचा पुरस्कार केला.त्याने अश्वमेध यज्ञ केला. लक्ष्मी आणि सरस्वती या वैदिक देवतांची प्रतिमा असलेली नाणी प्रचलित केली.

**४) विद्या आणि कलेचा आश्रयदाता :-**

चद्रंगुप्त व्दितीय यांच्या दरबारामध्ये नऊ विद्वान पंडीत होते. त्यांच्यासह चंद्रगुप्त व्दितीयच्या दरबाराला नवरत्न दरबार असे म्हणत असत.

**१) कालिदास :-** कवी, नाटककार

**२) धन्वंतरी :- वैद्यकशास्त्रज्ञ**

**३) वररुची :-** व्याकरणकार

**५) खंडणी /नजराणे** :- समुद्रगुप्तास खंडणी किंवा नजराणे देणे.

**६) समुद्र गुप्ताचे परराष्ट्र धोरण :-**

**१) कुशान / शक** :- समुद्रगुप्ताचा काळात वायव्य भारतात आणि सौराष्ट्रात कुशान आणि शकांची राज्ये होती.या राजांनी समुद्रगुप्ताचे मोठेपण मान्य केले.

**२) सिलोन** :- सिलोनच्या राजाने उत्तर भारतात यात्रेंकरुसाठी महाबोधी संघराम बांधला आणि समुद्रगुप्ताशी मैत्री निर्माण केली.

**६) अश्वमेध यज्ञ :-**

आर्यावर्तावरील लष्करी मोहिमा यशस्वी केल्यावर दिग्विजयाचे, विजयाचे प्रतिक म्हणून अश्वमेध यज्ञ केला.या यज्ञाची नाणी आजही उपलब्ध आहेत. नाण्याच्या एका बाजूला अश्वमेध पराक्रम आणि दुसऱ्या बाजूला यज्ञविधी आणि अश्वाचे चित्र कोरले आहेत.

**८) वैदिक धर्माचा आश्रयदाताआणि पुरस्कर्ता :-**

पूर्वीचा गुप्त सम्राटाप्रमाणे समुद्रगुप्ताने वैदिक धर्माला राजाश्रय दिला होता.तो स्वत: विष्णू भक्त होता.विष्णूचे वाहन गरुड हे समुद्रगुप्ताने आपल्या साम्राज्याचे प्रतिक मानले होते.वैदिक धर्मातील देव, देवतांची नाणी समुद्रगुप्ताच्या काळात प्रचलित होती.वैष्णवपंथ भरभराटीस आला होता. इतर धर्मांच्या बाबतीत धर्मसहिष्णू धोरण स्विकारले होते.

**९) विद्या आणि कलाप्रेमी सम्राट :-**

समुद्रगुप्ताने अनेक विद्वानांना राजाश्रय दिला होता.समुद्रगुप्ताना स्वत:विव्दान आणि कलाप्रेमी सम्राट होता.तो स्वत: उत्तम विणावादन करीत असे. समुद्रगुप्ताने धनुर्धारी व विणावादन करणारे चित्र असलेली सुवर्ण नाणी प्रचलित केली.

**चंद्रगुप्त व्दितीय/ विक्रमादित्य (इ.स. ३७५ ते इ.स.४१५) :-**

**१) राज्याभिषेक :-** समुद्रगुप्ताने आपल्या हयातीतच चंद्रगुप्त व्दितीय यास युवराज म्हणून नेमले होते.इ.स.३७५ मध्ये चंद्रगुप्त व्दितीय हा गादीवर आला.इ.स.३८०मध्ये त्याने स्वत:चा राज्यभिषेक केला.

**२) साम्राज्य विस्तार :-**

**१) चंद्रगुप्त विक्रमादित्याचे वैवाहिक संबंध :-** आपले साम्राज्य सुरक्षित राहावे आणि त्यात वाढ व्हावी या साठी चंद्रगुप्त व्दितीयनेविशिष्ठ वैवाहिक संबध निर्माण केले.नागवंशीय राजकन्या कुबेरनागा हिच्याशी चंद्रगुप्त व्दितीयाने विवाह केला आपली कन्य प्रभावती गुप्त हिचा विवाह वाकाटक राजा रुद्रसेन व्दितीय यांच्याशी लावून दिला.कुंतल

देशाचा राजा काकुस्थवर्मन यांच्याशी वैवाहिक संबंध जोडून आपले साम्राज्य बळकट केले.

**२) शक सत्तेचे उच्चाटन :-** शकाच्या आक्रमणांमूळे भारताची वायव्य सरहद्द अस्थिर राहिलेली होती. भारतावर सत्ता गाजवणाऱ्या शकांच्या विरुध्द चंद्रगुप्त व्दितीयने व्यापक मोहिम आखली व विजय मिळवला. शक सत्तेचे कायमचे उच्चाटन चंद्रगुप्त व्दितीय याने केले.म्हणून इतिहासकार चंद्रगुप्त व्दितीयला घ्शकारीङ असे म्हणतात.

**३) कुशानांशी संघर्ष :-** गांधार परिसरात कुशानाचे राज्य होते.चंद्रगुप्त विक्रमादित्याने कुशानाविरुध्द मोहिम काढली आणि त्यांना भारताबाहेर हुसकावून लावले.

**४) बंगालवर विजय :-** शक आणि कुशानांन विरुध्द मोहिमेत चंद्रगुप्त व्दितीय व्यस्त आहे हे पाहून बंगालच्या प्रांतपालाने बंड केले हे बंड चंद्रगुप्त व्दितीयने मोडून काढले.

**५) वायव्य भारतावरील मोहिम :-** हिंदू कुश पर्वता जवळ वाहिलीकांचे राज्य होते..चंद्रगुप्त विक्रमादित्याने वाहिलिकांविरुध्द मोहीम आखली आणि त्याचा पराभव केला.वाहिलीकांनी चंद्रगुप्त व्दितीय.याचे प्रभूत्व मान्य केले.

**६) दक्षिणपथावर विजय :-** समुद्रगुप्ताच्या काळांतील काही राजाने गुप्तांचे मांडलिकत्व स्विाकारले होत. त्यातील काही राजानी हे मांडलिकत्व त्यागले होते. चंद्रगुप्त व्दितीय यांने माहिम काढली आणि त्यांना पुन्हा मांडलिकत्व स्विकारण्यास भाग पाडले.

**२) अश्वमेध यज्ञ :-**

समुद्रगुप्ताप्रमाणेच चंद्रगुप्त व्दितीय याने विजय मिळवून साम्राज्यात भर टाकली आणि विजयाचे प्रतिक म्हणून अश्वमेध यज्ञ केला.

**३) वैदिक धर्माचा पुरस्कर्ता, अभिमानी :-**

समुद्रगुप्ताप्रमाणेच चंद्रगुप्त व्दितीय याने वैदिक धर्माचा पुरस्कार केला.त्याने अश्वमेध यज्ञ केला. लक्ष्मी आणि सरस्वती या वैदिक देवतांची प्रतिमा असलेली नाणी प्रचलित केली.

**४) विद्या आणि कलेचा आश्रयदाता :-**

चद्रंगुप्त व्दितीय यांच्या दरबारामध्ये नऊ विद्वान पंडीत होते. त्यांच्यासह चंद्रगुप्त व्दितीयच्या दरबाराला नवरत्न दरबार असे म्हणत असत.

**१) कालिदास :-** कवी, नाटककार

**२) धन्वंतरी :- वैद्यकशास्त्रज्ञ**

**३) वररुची :-** व्याकरणकार

४) **वराहमिहीर :-** ज्योतिषशास्त्रज्ञ

५) **अमरसिंह :- अमरकोषकार,** साहित्यिक

६) **क्षपणक :-** मांत्रिक

७) **शंकू :-** शिल्पकार

८) **विशाखा दत्त :-** साहित्यिक

९) **वेताळभट्ट :-** मांत्रिक

उपरोक्त नऊ पंडीत चंद्रगुप्त विक्रमादित्य.त्याच्या दरबारात होते.

**६) व्यापार आणि उद्योगांना चालना :-**

चंद्रगुप्त विक्रमादित्य हयाने व्यापाराला उत्तेजन दिले. पाटलीपुत्र ही आपली राजधानी काही काळ उज्जैन येथे नेली. पुढे उज्जैन ही उपराजधानी बनविली. यामुळे व्यापाराला चालना मिळाली. रेशमी कापड, तलम कापड, मसाल्याचे पदार्थ यांचा व्यापार प्रामुख्याने चालत असे. पाटलीपुत्र, आयोध्या या नगरी प्रमुख व्यापारी केंद्रे म्हणून उदयास आल्या होत्या. भडोच आणि सोपारा ही व्यापारी बंदरे प्रसिध्द होती.

**गुप्त साम्राज्याचे प्रशासन :-**

**अ.)केंद्रीय प्रशासण -**

१) **सम्राट :-** गुप्त साम्राज्यात सम्राट हा सर्वोच्च स्थानी होता.प्रजेचे संरक्षण करणे आंतीम न्यायदान करणे.युध्द प्रसंगी नेवृत्व करणे.कल्याणकारी कार्ये प्रत्यक्षात आणणे ही कार्य सम्राटाला करावी लागत असत.

२) **युवराज :-** युवराज याला राज्य कारभारातमध्ये महत्वाचे स्थान होते.युवराज राज्यकार भारामध्ये सहभागी होत असे.युवराजांचीच नियुक्ती प्रांतपाल म्हणून होत असे.

३) **मंत्रीपरिषद :-** सम्राटाच्या राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रि परिषद आस्त्विात होती.गुणतत्तेनुसार मंत्र्यांची नियुक्ती केली जात असे.अमान्य,सचिव आणि मंत्री या नावाने मंत्रीमंडळ ओळखल्या जात असत.

१) **महासेनापती :-** लष्कराचा कारभार पाहणे

२) **महासंधी :-** परराष्ट्र व्यवहार पाहाणे संबंध निर्मान करणे

३) **महाभंडारधिकृत :-** खजीनदार म्हणुन कार्य करणे राजकोष या हिशोब ठेवणे

४) **सर्वाध्यक्ष :-** केंद्रीय कार्यालयाचा प्रमुख

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

---

[illegible]

उज्जैन, वल्लभी, कांची, आयोध्या, प्रभावती, नाशिक ही विद्येची केंद्रे म्हणून प्रसिध्द झाली. वेद, वेदांन्ते, शास्त्रे तत्वज्ञान, खगोलशास्त्र, तर्कशास्त्र इत्यदी विषय विकसित झाले. गुप्त सम्राटांनी संस्कृत भाषेला राजाश्रय दिला. यामुळे संस्कृत भाषेत उत्कृष्ट साहित्य निर्माण झाले.

**२) संस्कृत साहित्य :-** कालिदासाने घशाकुंतलङ, घमालाविकाग्नीमित्रङ, घविक्रमोर्वशीयङ घमेघदूतङ, घऋतुसंहारङ, घरघुवंशङ, घकुमारसंभवङ ही नाटके आणि काव्ये लिहिली. संस्कृत साहित्यातील उत्कृष्ट साहित्य म्हणून कालिदासाचे साहित्य उल्लेखनीय आहे. भास हा नाटकार गुप्त काळात होऊन गेला. त्याने घस्वप्नवासवदत्ताङ आणि घचारुदत्तङ ही नाटके लिहिली. विशाखादत्त या नाटककाराने घमुद्राराक्षसङ आणि घदेवीचंद्रगुप्तमङ ही नाटके लिहिली. भारवीचे घकिर्तार्जुनीयङ, भट्टीचे घरावणवधङ ही काव्ये ही गुप्त काळात रचली गेली. भृतुर्हरीची घश्रृंगारशतकङ, घवैराग्यशतकङ आणि घनीतिशतकङ ही काव्ये ही गुप्तकाळामध्ये निर्माण झाली. विष्णू शर्मा याने घपंचतंत्राच्या कथाङ लिहिल्या. पुराणग्रंथांमध्ये गुप्त राजवंशाची माहिती लिहिण्यात आली. जातककथामधून गौतम बुध्दांच्या जीवनातील प्रसंगांचे वर्णन करण्यात आले आहे. अशा प्रकारे उत्कृष्ट साहित्य गुप्तकाळामध्ये निर्माण झाले.

**३) गणित शास्त्र :-** आर्यभट्ट हा गणितशास्त्रज्ञ गुप्त काळात होऊन गेला. शून्याची संकल्पना, क्षेत्रफळ, भूमिती इत्यादीची चर्चा आर्यभट्टाने घआर्यभट्टीयङ या ग्रंथात केली आहे. तसेच खगोल शास्त्राची ही महिती लिहिली आहे. घआर्यभट्टीयङ ग्रंथात पृथ्वीची गती, सूर्यमंडळ, चंद्रग्रहण, या बाबीची चर्चा केली आहे.

**४) खगोलशास्त्र :-** वराहमिहीर या खगोलशास्त्रज्ञाने ज्योतीषशास्त्रावर आणि खगोलशास्त्रावर घपंचसिंध्दांतकङ आणि घलघूजातकङ हे ग्रंथ लिहिले. ब्रम्हगुप्ताने गुरुत्वाकर्षणाचा सिंध्दांन्त मांडला.

**४) वैद्यकशास्त्र :-** वाग्भट्टाने घअष्टांगऱ्हदयीङ या ग्रंथात विविध रोगांची आणि औषधांची माहिती लिहिली. घचरकसंहिताङ आणि घसुश्रूतसंहिताङ याच काळात निर्माण झाल्या धन्वंतरी हा वैद्यकशास्त्रज्ञ याचा काळात होऊन गेला.

**५) रसायनशास्त्र :-** गुप्त काळात रसायनशास्त्राचा विकास झाला. दिल्ली जवळील मेहरैवली या ठिकाणी एक लोहस्तंभ उभारण्यात आला. आजही हा लोहस्तंभ जशाच्यातशा आवस्थेमध्ये आहे. यावरुन तात्कालीन रसायण शास्त्राची माहिती मिळते.

**६) स्थापत्यकला** :- गुप्तकाळात स्थापत्य कलेचा विकास झाला. देवगडचे दशावतार मंदिर भूमरा येथील शिव मंदिर ही स्थापत्यकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. स्थापत्यकलेमध्ये भाजलेल्या विटा आणि घडीव दगड यांचा उपयोग केला जाऊ लागला.

**७) धातूकला** :- गुप्तकाळात धातूच्या मूर्ती तयार होऊ लागल्या. ब्रॉन्झ ,पितळ,लोखंड, यापासून मूर्ती तयार होऊ लागल्या .धातूच्या मूर्ती तयार करण्याची कला विकसित झाली.

**८) मातीच्या मूर्ती** :- गुप्तकाळात मातीच्या मूर्ती तयार होऊ लागल्या. सुलतानगंज येथील मातीची गौतम बुध्दांची मूर्ती या कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. पटना येथील वस्तुसंग्रालयात गुप्तकालीन मातीच्या मूर्ती आजही पहावयास मिळतात.

**९) शिल्पकला** :- गुप्तकाळात दगडांना गुळगुळीत करुन त्यापासून मूर्ती तयार करीत असत. विष्णु, गौतम बुध्द,यांची शिल्पे तयार झाली.

**११) चित्रकला** :- अंजिठा येथे गुप्तकालीन चित्रकला पहावयास मिळते.या चित्रकलेमध्ये देव,देवता, निसर्ग सौंदर्य , मानवी जीवनातील प्रसंग, धार्मिक प्रसंग हे प्रमुख विषय चित्रीत केलेले आहेत. अजिंठा येथील ध्यानस्थ अवलोकितेश्वर आणि अप्सरा-राणी यांची चित्रे गुप्त काळातच तयार झाली. उत्कृष्ट रंगकाम आणि टिकाऊपणा ही या चित्रांची वैशिष्ट्ये आहेत.

**गुप्तकालीन आर्थिक प्रगती :-**

गुप्तकाळात हा एकसंघ साम्राज्य निर्माण झाले.त्यामुळे राजकीय स्थैर्य निर्माण झाले. आर्थिक प्रगती मोठया प्रमाणावर घडून आली.शेतीकडे विशेष लक्ष दिल्यामुळे आणि पाणी पुरवठ्याची व्यवस्था केल्यामुळे तसेच बी, बियाणांचे वाटप केल्यामुळे शेती व्यवसायाचा विकास झाला.माफक कर लावल्यामुळे शेतकरी वर्ग समाधानी होता.चंद्रगुप्त विक्रमादित्याने उदयोग आणि व्यापाराकडे विशेष लक्ष दिले. त्यामुळे व्यापारात वाढ झाली.मांडलिक राजांकडून खंडण्या आणि नजराणे मिळत असल्यामुळे आर्थिक सुबत्ता निर्माण झाली.

सूती, रेशमी आणि तलम कापड तयार करण्याचे उदयोग चांगले चालत असत. शेतीची अवजारे तयार करणे ,अलंकार तयार करणे,गृहउपयोगी वस्तू तयार करणे,कापड तयार करणे,शस्त्रास्त्रे तयार करणे हे व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असत. धातूकामही चालत असे.विणकर,सोनार,कुंभार आणि सुतार हे व्यावसायिक होते.

**व्यापार :-** गुप्तकाळात अंतर्गत व्यापार विकसित झालेला होता.शेती उत्पादने,गृहउपयोगी

भारतात वाकाटकांची बलाढ्य सत्ता उदयास आली. गुप्त साम्राज्याच्या शेवटच्या काळात स्थानेश्वरला वर्धन घराणे, वल्लभीला मैत्रक घराणे, माळव्याला वर्मन घराणे आणि कनौजला मौरवरी घराणे ही महात्वाकांक्षी राजघराणी उदयास आली. यातील पराक्रमी सम्राटांनी आपआपली साम्राज्ये निर्माण केली. परिणामी गुप्त साम्राजाचा ऱ्हास झाला.

**३) आर्थिक दुरावस्था :** - गुप्त साम्राज्यात प्रारंभीपासून असलेली आर्थिक सुबत्ता शेवटच्या काळात अस्तित्वात राहिली नाही. करवसूलीत घट, व्यापारात मंदी, मांडलिक राजांचे स्वातंत्र्य, खंडण्यातील घट यामुळे आर्थिक दुरावस्था निर्माण झाली. आर्थिक दुरावस्थेमुळे गुप्त साम्राज्याचा ऱ्हास घडून आला.

**४) परकीयांची आक्रमणे :-** गुप्त सामाज्यात प्रारंभीच्या सम्राटांच्या लष्करी योगदानामुळे गुप्त सम्राटांचा सर्वत्र प्रचंड दरारा होता. परंतु शेवटच्या काळात दूर्बल वारसदारामुळे हा दरारा कमी झाला. याचा फायदा परकीय असलेल्या हूणांनी घेतला. हूणांनी गुप्त साम्राज्याच्या प्रदेशांवर हल्ले केले. गुप्त साम्राज्याचा प्रदेश जिंकून घेतला. या परकीय आक्रमणांमुळे गुप्त सामाज्याचा ऱ्हास झाला.

**५) साम्राज्याचा अति विस्तार :-** गुप्त सामाज्य हे जवळ-जवळ सर्व आर्यावर्तावर प्रस्थापित झाले होते. प्रारंभीच्या काळात सम्राटांचे प्रशासनावर असलेली नियंत्रण पुढील काळात कमी झाले. परिणामी गुप्त सामाज्याचा ऱ्हास झाला.

**६) मांडलिक राजांची स्वतंत्रवृत्ती :-** गुप्त साम्राज्याच्या काळात मांडलिकत्व पत्करलेल्या सर्व राजघराण्यातील शासक पुढील काळात स्वतंत्रवृत्तीने वागू लागले. त्यांची स्वातंत्र्याची अकांक्षा ते पूर्ण करु लागले. परिणामी गुप्त साम्राजाचा ऱ्हास घडून आला असे म्हणता येते.

## वाकाटक घराणे : (२५०-५५०)

**प्रस्तावना :-**

भारतीय इतिहासामध्ये विशेषतः दक्षिण भारतीय इतिहासामध्ये जी साम्राज्य निर्माण झाली. त्यामध्ये वाकाटकाचे साम्राज्य महत्वपूर्ण आहे. नर्मदा नदीपासून ते तुंगभद्रा नदीपर्यंत व अरबी समुद्रापासून ते बंगालच्या उपसागरापर्यंतच्या प्रदेशावर वाकाटकांनी आपले साम्राज्य निर्माण केले.राजकीय क्षेत्राबरोबरच,सांस्कृतिक क्षेत्रातही वाकाटकांनी बहुमोल असे योगदान दिले.वाकाटकांच्या काळात दक्षिण भारताची प्रगती झाली.

**साधने :-** सेतुबंध,दशकुमारचरित्र, पुराणग्रंथ तसेच अजिंठा येथील क्रमांक- १

# प्रकरण - ३

# सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी

## (Social and Religious Movements)

भारतात १९ व्या शतकात घडून आलेल्या सामाजिक व धार्मिक परिवर्तनाच्या चळवळी अतिशय महत्वपूर्ण आहेत. या चळवळीमुळे भारतीय समाजाला एक वेगळी दिशा मिळाली. समाजात जागृती होऊन तो समाज विचारशील बनला. तसेच समाजात प्रबोधन सुरु होऊन समाज गतीशील बनला होता. भारतीय समाजामध्ये वैचारिक जागृती होऊन धार्मिक चळवळीचा परिणाम राजकीय चळवळीवरही घडून आला. पाश्चात्य विद्या संपादन केलेल्या सुशिक्षीत तरूण समाज सुधारकांनी सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या चळवळी हाती घेतल्या. यातून सामाजिक सुधारणेला व समाजाच्या आधुनिकीकरणाला गती मिळाली.

**१) राजा राममोहन रॉय - ब्राम्होसमाज (Brahamo Samaj) :-**

भारतीय समाजात वैचारिक जागृती करण्याचे मौलिक कार्य १८ व्या शतकाच्या सुरुवातीला अनेक विचारवंतानी केले त्यामध्ये राजा राममोहन रॉय हे अग्रेसर होते म्हणूनच त्यांना भारतीय प्रबोधनाचे अग्रदूत असे म्हटले जाते. भारताच्या इतिहासातील त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांना आधुनिक भारताचे जनक असेही म्हणतात.

त्यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील हुबळी जिल्ह्यातील राधानगर या गावी एका ब्राम्हण कुटूंबात झाला. त्यांचे शिक्षण पाटणा व बनारस येथे झाले. संस्कृत, बंगाली, हिदू, ग्रीक, फारसी, अरबी, लॅटिन व फ्रेंच इत्यादी भाषांचा सखोल अभ्यास केला. पुढे त्यांनी प्रमुख धर्मग्रंथाचा अभ्यास केला. या अभ्यासामुळे त्यांना खऱ्या धर्मतत्त्वांची ओळख झाली. परमेश्वर एक आहे हे सर्व धर्माचे सार असून सत्य आहे असे त्यांचे मत बनले. बहुदेववाद, अवतारवाद, मूर्तिपूजा, कर्मकांड या सर्व गोष्टी निरर्थक व भ्रामक आहेत असे त्यांना वाटू लागले. आपल्या या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी १८१५ मध्ये आत्मीयसभा व

१८२२ मध्ये युनिरियन कमिटी या दोन संस्था स्थापन केल्या. पुढे या दोन संस्थांची सांगड घालून २० ऑगस्ट १८२८ रोजी द्वारकानाथ टागोर, कालीनाथ रॉय, व मथुरानाथ मल्लिक यांच्या मदतीने कलकत्ता येथे ब्राम्होसमाजाची स्थापना केली. धर्मतत्त्वांची ओळख भारतीयांना करून देण्याचे समाजातील अनिष्ट चालीरिती, रूढी, प्रथा, परंपरा नष्ट करण्याचे आणि इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करून स्वत:ला आधुनिक विचार प्रस्तूत करण्याचे महत्वपूर्ण कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले. त्याच उद्देशाने त्यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना केली हिंदू धर्माचे शुद्धीकरण करून खऱ्या हिंदू धर्म तत्वाची ओळख भारतीयांना करून देणे भारतीयांचा ख्रिश्चन धर्माकडे लागलेला ओंढा थोपवून हिंदू समाज व धर्म यात सुधारणा घडवून आणने हाही या समाजाचा हेतू होता.

**ब्राम्होसमाज :-**

ब्राम्हो समाज ही हिंदू धर्मातील पहिली सुधारणा चळवळ होती. २० ऑगस्ट १८२८ रोजी कलकत्ता येथे राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाचीस्थापना केली. हे त्याचे संस्थापक होते. ईश्वर एक आहे हे उपनिषदातील तत्त्व या समाजाचे मुख्य तत्त्व आहे. एकेश्वरवादाचा प्रसार व मूर्तीपूजेला विरोधही या समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. जगातील महत्वाच्या धर्माचा तौलनिक अभ्यास करून त्यातील समान तत्वे शोधून काढून त्यांनी वैश्विक धर्माचा विचार यात मांडलेला होता.

**ब्राम्हो समाजाची तत्त्वे**

१. ईश्वर एक असून तो निराकार असून सर्वव्यापी आहे. मानवाने निराकार ईश्वराची उपासना करावी.
२. ईश्वर हा सर्वांचा पिता आहे. म्हणून आपण सर्वजण एकमेकांचे बंधू आहोत.
३. ईश्वराचे अस्तित्व निश्चित वस्तूत किंवा मूर्तीत नसते म्हणून मूर्तीपूजा करू नये मूर्तीला केलेली पूजा ईश्वराला पोहचत नाही.
३. ईश्वर निराकार असून तो साकार होऊ शकत नाही. म्हणून अवतारवाद ही एक भ्रामक समजूत आहे.
५. आत्मा अमर. असून तो आपल्या कृत्याबद्दल केवळ ईश्वरालाच जबाबदार असतो.
६. पूजा, अर्चा व बलीदान याला ब्राम्हो समाजाचा विरोध आहे.

७. ब्राम्हो समाज सर्व धर्माचा आदर करतो कोणाची निंदा करीत नाही.
८. एकेश्वरवाद हाच सत्याचा मार्ग आहे
९. ब्राम्हो समाजात मंदिर व तीर्थस्थानाला कसलेच स्थान नव्हते.
१०. व्यक्तीने प्रपंचास परमार्थरूप मानून पाहावे.

अशा रीतीने ईश्वराची उपासना, मानव जातीवर प्रेम, सर्व धर्म व धार्मिक ग्रंथावर श्रद्धा हे बाम्हो समाजाचे प्रमुख तत्त्वज्ञान होते.

**ब्राम्हो समाजाची वाटचाल -**

राजा रायमोहन रॉय यांच्या विचाराने व कार्याने प्रभावित होऊन ब्राम्हो समाजाची सदस्य संख्या वाढली. प्रत्येक आठवड्याला सामुदायिक प्रार्थना असे. वैदिक ग्रंथाचे पठण, प्रवचन व सामूहिक संगीतमय भजन यांचा उपासनेत सहभाग असे. हिंदू धर्मालाच विशुध्द स्वरूप देण्याचा प्रयत्न असल्याने सनातनी हिंदूकडून त्यास प्रखर विरोध झाला. परंतु रॉयनी एकेश्वरवादाच्या प्रसारासाठी अनेक पुस्तके प्रकाशित केली 'संवाद कौमुदी' या नियतकालिकातून ब्राम्हो समाजाच्या तत्वज्ञानांचा प्रचार करण्यात आला. स्त्री-पुरुष समानतेची कल्पना मांडून स्त्रीदास्य विमोचनाचे कार्य सुरु केले. सती प्रथेविरूध्द आंदोलन उभारले त्यामुळे त्यावेळचे व्हाईसरॉय बेटिंकने १८२९ मध्ये सतीबंदीचा कायदा केला. इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला. वेदांताच्या अभ्यासासाठी वेदांत कॉलेज काढले. रॉय यांच्या मृत्युनंतर देवेंद्रनाथ टागोर यांनी १८३९ मध्ये तत्वशोधिनी सभा स्थापन करून ब्राम्हो समाजाचा प्रसार केला. त्यानंतर १८६२ मध्ये केशवचंद्र सेन यांनी ब्राम्हो समाज लोकप्रिय केला. १८६२ मध्ये त्यानी आदि ब्राम्हो समाजाची स्थापना केली. १८७८ मध्ये आंनद बोस यांनी साधारण ब्राम्हो समाज स्थापन केला.

**ब्राम्हो समाजाचे कार्य -**

**१. धार्मिक सुधारणा -** ब्राम्हो समाजाने हिंदू धर्माचे शुद्धीकरण केले. एकेश्वरवादाचे तत्त्वज्ञान मांडून हिंदू धर्मातील उच्च आदर्श तत्त्वे लोकांना पटवून दिली. हिंदू धर्माला बुध्दीनिष्ठ व मानवतावादी बनविण्याचा प्रयत्न केला. बहुदेव वाद, मूर्तीपूजा, व्रतवैकल्य त्याज ठरविले. कर्मकांडाचे निर्मुलन केले.

**२. सामाजिक सुधारणा -**

ब्राम्हो समाजाने समाजातील अनिष्ट प्रथांचे निर्मुलन करण्यासाठी प्रयत्न केले. स्त्री उध्दाराचे महत्वाचे कार्य कले. सती प्रथा बालविवाह, बहुपत्नीकत्व,

पडदा पध्दती या सर्व प्रथांना ब्राम्हो समाजाने विरोध केला. ब्राम्हो समाजाच्या प्रयत्नामुळेच ब्रिटिश सरकारने सतीबंदी कायदा व सिव्हील मॅरेज ॲक्ट पास केला जाती व्यवस्थेच्या निर्मुलनासाठी चळवळ उभारली होती.

**३. शिक्षण प्रसार -**

ब्राम्हो समाजाने शिक्षण प्रसारावर भर दिला रॉय यांनी पारंपरिक भारतीय पद्धतीचे शिक्षण देण्याऐवजी पाश्चात्य व वैज्ञानिक शिक्षणपद्धतीचा आग्रह धरला. इंग्रजी, गणित, भौतिकशास्त्र, भूगोल, रसायनशास्त्र यासारखे विषय शिकविले पाहिजेत असा आग्रह त्यांनी धरला होता.

**२) प्रार्थना समाज (Prarthna Samaj) -**

हिंदू धर्म व हिंदू समाज यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात प्रार्थना समाजाची स्थापना झालेली आहे प्रार्थना व सेवा यांच्याद्वारेच ईश्वराची पूजा करावी अशी या समाजाची धारणा असल्याने तिच्या प्रवर्तकांनी या चळवळीला प्रार्थना समाज असे नांव दिले. ब्राम्हो समाजाच्या धर्तीवर १८६७ मध्ये मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली डॉ.आत्माराम पांडूरंग, न्या.रानडे, डॉ.भांडारकर यांनी प्रार्थना समाज स्थापन करण्यामध्ये मोठे योगदान दिले त्यानीच यास तात्वीक बैठक प्राप्त करून दिली ३१ मार्च १८६७ रोजी या समाजाची स्थापना केली गेली.

**प्रार्थना समाजाची तत्त्वे -**

१. परमेश्वर एक असून तो विश्वाचा निर्माता आहे
२. सत्य, सदाचार व भक्ती हे परमेश्वराच्या उपासनेचे खरे मार्ग आहेत.
३. प्रार्थनेमुळे फलप्राप्ती होत नाही तर आध्यात्मिक उन्नती होते.
४. परमेश्वर अवतार घेत नाही त्याने कोणताही धर्मग्रंथ लिहिला नाही.
५. मूर्तीपूजा करू नये कारण मूर्तीपूजा परमेश्वराला पोहचत नाही
६. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. सर्वांनी बंधुत्वाच्या भावनेने एकमेकांशी व्यवहार करावा.
७. प्रत्येक प्राणीमात्राच्या ठिकाणी परमेश्वर निवास करतो.
८. प्रत्येक मनुष्याने परमेश्वराची पूजा केली पाहिजे.
९. परमेश्वराला भक्तीभावाने शरण गेले म्हणजे परमेश्वर प्राप्ती होते.
१०. परमेश्वराची भक्ती करीत असताना फलाची अपेक्षा करू नये.

**प्रार्थना समाजाची वाटचाल -**

डॉ.आत्माराम पांडूरंग, डॉ.आर.जी.भांडारकर, ना.ग.चंदावरकर, महर्षी वि.रा.शिंदे, न्या.रानडे, यांनी प्रार्थना समाजाच्या कार्याला चालना दिली. या समाजाच्या माध्यमातून धार्मिक व सामाजिक सुधारणाचे कार्य केले. प्रार्थना समाजास मूर्तीपूजा, बहुदेववाद, कर्मकांड, अवतारवाद या गोष्टी मान्य नव्हत्या. प्रार्थना समाजाने उपासनेसाठी अनेक प्रार्थना मंदिरे बांधली. न्या. रानडे यांनी प्रार्थना समाजाच्या विचारसरणीच्या समर्थनासाठी एकेश्वरवाद्यांची कैफियत या नावाचा निबंध प्रसिद्ध केला.

**प्रार्थना समाजाचे कार्य -**

प्रार्थना समाजाने धार्मिक व सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले. महाराष्ट्रात धार्मिक जागृती घडवून आणण्याचे कार्य प्रार्थना समाजाने केले. पुढीलप्रमाणे कार्य या समाजाने केले

१. **सामाजिक कार्य -** प्रार्थना समाजाने सामाजिक क्षेत्रात अनेक सुधारणा घडवून आणल्या. हिंदू धर्मातील अनेक अनिष्ट गोष्टींना विरोध केला. मूर्तीपूजा अवतार कल्पना, कर्मकांड, बहुदेववाद इत्यादी गोष्टी त्याज्य ठरविल्या. स्त्रियांवरील अनेक निर्बंध दूर केले. पडदा पद्धत, बालविवाह, या प्रथांना विरोध केला. अनाथ स्त्रिया व मुले यांच्यासाठी अनाथाश्रम काढले. न्या रानडे यांनी विधवा विवाहास चालना मिळावी म्हणून विधवा विवाह उत्तेजन मंडळ स्थापन केले. स्त्रियांसाठी शाळा काढल्या.

२. **धार्मिक कार्य -** प्रार्थना समाजाने उपासनेसाठी अनेक मंदिरे बांधली. धार्मिक क्षेत्रातही कार्य केले आहे. हिंदू धर्मातील अनेक अनिष्ट गोष्टींना विरोध केला. मूर्तीपूजा, अवतारवाद, कर्मकांड व बहुदेववाद इत्यादी गोष्टी त्याज्य ठरविल्या, शुद्ध मनाने केलेली प्रार्थना किंवा उपासना हीच खरी ईश्वर भक्ती आहे असा प्रचार या समाजाने केला महाराष्ट्रात धार्मिक जागृती घडवून आणण्याचे कार्य प्रार्थना समाजाने केले.

३. **शैक्षणिक कार्य -** शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी प्रार्थना समाजाने प्रयत्न केले. कामगार वर्गासाठी रात्रीच्या शाळा काढल्या. मोफत वाचनालये काढली. या समाजाने 'सुबोध पत्रिका' हे नियतकालीक चालविले. 'प्रार्थना संगिन', 'प्रार्थना समाजाचा इतिहास' हे ग्रंथ प्रकाशीत केले.

प्रार्थना समाजाचे कार्य चांगले असूनही त्याची मोठ्या प्रमाणात वाढ झाली

नाही. या समाजाचे अनेक नेते ब्रिटिश समर्थक होते. या समाजात ब्राम्हण लोकांचा अधिक भरणा असल्याने ते बहूजन समाजाच्या सुखदु:खाशी समरत झाले नाहीत. महर्षी शिंदे यांनी फारकत घेतली.

**३) आर्य समाज (Arya Samaj) -**

१९ व्या शतकातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील महत्वाची चळवळ म्हणजे आर्य समाज होय. दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. सामाजिक सुधारणाबरोबर स्वदेश व स्वधर्म याविषयीच्या अस्मितेला संजीवनी देण्याचे कार्य आर्य समाजाने केले भारतभर फिरून दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाचा प्रसार केला. दयानंदाचे मुळ नाव मूळशंकर असे होते. त्यांचा जन्म १८२४ मध्ये झाला. वयाच्या १४ व्या वर्षी त्याच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली १८४५ ते १८६० या काळात ते ज्ञानाच्या शोधात अनेक ठिकाणी भटकत राहिले. त्यांनी स्वामी निरजानंद सरस्वती यांच्याकडून शिष्यत्व स्विकारले. आणि स्वामी दयानंद सरस्वती हे नांव धारण केले. त्यांनी योग व वेद यांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी आयुष्यभर समाजप्रबोधनाचे आणि हिंदू धर्माच्या पुनरूज्जीवनाचे कार्य केले. देशभर दौरे काढून आपल्या मताचा प्रचार केला. ते मुंबईत आले असतानाच १० एप्रिल १८७५ रोजी त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली.

**आर्य समाजाची तत्त्वे -**

१. वेद ग्रंथांना अंतीम प्रमाण मानणे वेद हे ईश्वरापासून निर्माण झाले नसून तो सर्व विश्वाचा निर्माता व पालक आहे.
२. प्रत्येक व्यक्तीने सत्याचे ग्रहण व असत्याचा त्याग केला पाहिजे.
३. सद्‌गुणांचे संगोपण व संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने चांगल्यावाईट नीतीनियमांना अनुसरून विचार करावा.
४. मानवजातीची भौतिक, आध्यात्मिक व सामाजिक उन्नती करून मानवाचे कल्याण साधने हाच आर्य धर्माचा मूळ उद्देश आहे.
५. प्रेम, न्याय व वैयक्तिक गुण यावर आधारीत प्रत्येकाने वागणूक ठेवली
६. समाजाच्या कल्याण्यासाठी वैयक्तिक मतभेद बाजूला सारून प्रयत्न करावेत.
७. अज्ञानाचा नारा करून ज्ञानाचा प्रसार करणे हे प्रत्येकाने ध्येय ठरवावे.

८. आर्य विद्यालयात स्त्री पुरुषांना वेदानिष्ठ शिक्षण देणे.

९. प्रत्येक सदस्याने आपल्या उत्पन्नाचा ०.०१ वा भाग समाजकल्याण आर्य विद्यालय, व आर्य प्रकाश या वृत्तपत्रांकरीता देणे

१०. सर्व ज्ञानाचा उगम व सर्व वस्तूंचे आदिकरण ईश्वर आहे.

**आर्य समाजाचे कार्य -**

आर्य समाजाने सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे मानवी जीवनाचे प्रश्न वैदिक तत्वानुसार सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**१. धार्मिक सुधारणा -**

या समाजाने वेदांना प्रमाण माणून आपले तत्त्वज्ञान मांडले. हिंदू धर्मातील मूर्तीपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये या गोष्टी नाकारल्या. परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी पुरोहितांची गरज नाही असे सांगितले. समाजाने शुध्दीकरण मोहीम हाती घेतली. हिंदू धर्मातून खिश्चन, मुस्लीम धर्मात गेल्यांना परत स्वधर्मात घेण्याचे कार्य आर्य समाजाने केले.

**२. सामाजिक सुधारणा -**

या समाजाने जातीभेद, जातीव्यवस्था, अस्पृश्यता पालन यांना विरोध केला. वर्ण हा जन्मावर नव्हे तर गुणकर्मावर अवलंबून असतो असे सांगितले. पडदा पद्धती, हुंडापद्धती, बहुपत्नी पद्धती, देवदासी या प्रथांवर प्रहार करीत आंतरजातीय विवाहाचे त्यांनी समर्थन केले.

**३. शैक्षणिक कार्य -**

देशाची व समाजाची प्रगती ही शिक्षणावरच अवलंबून आहे. हे ओळखून आर्य समाजाने अनेक संघटना स्थापन केल्या लाला हरदयाळ यांनी लाहोर येथे 'दयानंद ॲग्लो वैदिक कॉलेज' स्थापन केले. स्वामी श्रद्धानंद यांनी गुरूकुल पद्धतीच्या शाळा सुरु केल्या. या समाजाने महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर, व मुंबई येथे समाजाचे शैक्षणिक कार्य चालू आहे.

**४. राष्ट्रभक्तीचा प्रसार -**

आर्यावर्त हा आर्यांचा आहे असे दयानंदानी जाहीर केल्यामुळे हिन्दी लोकामध्ये राष्ट्रभक्तीची भावना वाढीस लागली. त्यांनी स्वदेशीला महत्व दिले. वेदांकडे चला असा संदेश दिला.

**४) थिऑसॉफिकल सोसायटी (Theosophical Society) -**

हिंदू प्रबोधनात थिऑसॉफिकल सोसायटीने अतिशय महत्वाची भूमिका

बजावली आहे. थिऑसॉफिकल चळवळ ही धार्मिक सामाजिक क्षेत्रात एक वेगळा विचार मांडणारी पाश्चात्य संस्कृतीतील चळवळ आहे. या सोसायटीने हिंदू धर्मीयांच्या प्रबोधनासाठी फार मोठे कार्य केले आहे. ॲनी बेझंट यांनी या सोसायटीच्या मार्फत कार्य केले.

**थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना -**

थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना मॅडम ब्लाव्हाटस्की व कर्नल हेन्री ऑलकॉट यांनी १८७५ मध्ये अमेरिकेत केली. थिऑसॉफिकल हा ग्रीक भाषेतील शब्द आहे. थिऑस (Theos) म्हणजे परमेश्वर आणि सोफिया (sophia) म्हणजे ज्ञान थिऑसॉफिकल या शब्दाचा अर्थ ईश्वरीय ज्ञान होय. ही चळवळ विकसीत झाल्यावर तिने इजिप्शियन हिंदू व बौद्ध धर्मातील कल्पना आणि संज्ञांचा वापर केला.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी कर्नल ऑलबॉट यांना विनंती केल्यामुळे ते इ.स.१८७९ मध्ये भारतात आले. त्यांच्यावर प्राचीन हिंदू धर्माचा प्रभाव होता. त्यांनी हिंदू धर्माची महती गाऊन हा धर्म सर्व धर्मात कसा श्रेष्ठ आहे हे सांगितले त्यांनी दयानंद सरस्वती यांच्याबरोबर काही काळ कार्य केले आणि इ.स.१८८२ मध्ये भारतात मद्रासजवळ अड्यार येथे थिऑसॉफिकल सोसायटीची शाखा स्थापन केली.

**थिऑसॉफिकलची प्रमुख तत्त्वे -**

१. बंधुत्वावर आधारिंत सर्वाची एंक संघटना स्थापन करणे
२. जगातील प्राचीन धर्म, तत्वज्ञान व विज्ञान यांचा अभ्यास करणे
३. निसर्ग नियमांचा शोध घेऊन मानवातील दैवी शक्तीचा विकास करणे
४. ज्या ब्रम्हाने मानवाची निर्मिती केली आहे त्याचीच संत, तत्वज्ञ, प्रेषित इत्यादी ही सर्व लेकरे आहेत आणि त्याच्याच मार्गदर्शनाखाली जगाचे व्यवहार चालू आहेत. याची जाण ठेवणे.
५. जगातील मानव जातीत जात, धर्म, वर्ण, वंश असा कसलाही भेद न मानता बंधुभावना निर्माण करणारे केंद्र स्थापन करणे.
६. सत्कर्तातून मानवाला मोक्ष निर्वाण प्राप्ती होते.
७. आत्मा कोणतेही लिंगभेद मानीत नाही स्त्री पुरुष समान आहेत.
८. परमेश्वरी इच्छेनुसार जगातील सर्व घटिते होत असतात.
९. मानवाने फक्त आपल्या एकट्याच्या मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्न न करता

इतरांनाही मोक्षप्राप्तीसाठी मदत करावी.

११. प्राचीन हिंदू धर्माचे पुनर्संशोधन करण्यासाठी हिंदू तरूणात संस्कृतचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**थिऑसॉफिकल सोसायटीची वाटचाल -**

भारतात थिऑसॉफिकल सोसायटीची वाट व विस्तार करण्याचे श्रेय ॲनी बेझंट यांना दिले जाते. चराचर सृष्टी, देवांचे ऐक्य, आत्मचिंतन अंतिम सत्य याबाबत त्यांच्या कल्पना विकसीत झाल्या या कल्पनांनी प्रभावीत होऊन त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या आनुयायी बनल्या आणि या सोसयाटीमध्ये त्यांचा नावलौकिक झाला अनेक पवित्र स्थळांना भेटी दिल्या हिंदू धर्मगुरुशी चर्चा केली. त्यांनी बराच काळ बनारास येथे वास्तव्य केले. त्यांचे व्यक्तीगत मुख्यालय बनारस होते. वैदिक व हिंदू तत्त्वज्ञानाचे त्यांनी नव्या पद्धतीने स्पष्टीकरण केले जगातील तत्त्वज्ञानाचे सार प्राचीन हिंदू धर्म होता अशी त्यांची गाढ श्रद्धा होती. हिंदूधर्म ही खाण असून कोणीही त्यात सुरक्षित राहू शकतो. असा हिंदूच्या मनाच्या मोठेपणाबद्दल त्या म्हणत असत.

**थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य -**

या सोसायटीच्या माध्यमातून ॲनी बेझंट यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. सुरुवातीला त्या सोसायटीच्या आनुयायी बनल्या होत्या १९०७ मध्ये त्या या सोसायटीच्या अध्यक्षा झाल्या. मानवता वाढीसाठी पयत्न करण्याच्या हेतूने त्यांनी १९०८ मध्ये (Theasophic order of ser) ची स्थापना केली. यातून तिने बंधुभाव, राष्ट्रीय शिक्षण, बालविधवा बंदीचा उपदेश केला. देहांताची शिक्षा बंद करणे, सहकार्याची भावना वाढविणे, दवाखान्यांना भेटी, तुरुंग सुधारणा करण्याचा सल्ला दिला. बालकल्याण, अंधांना मदत इत्यादी उपक्रमांना पाठींबा दिला. त्यांच्या उपक्रमामुळे ५०टक्के लोक त्यांच्या सोसायटीचे सदस्य झाले होते.

**शैक्षणिक व वाङ्मयीन कार्य -**

सुरुवातीला ॲनी बेझंट सोसायटीच्या सदस्य (अनुयायी) बनल्या. ल्युसिकर नियतकालिकाचे संपादक म्हणूनही काम केले. या सोसायटीचे मूळ तत्त्वज्ञान हे हिंदू उपनिषदे व वेदावर आधारलेले होते या सोसायटीने अनेक ठिकाणी संस्कृत शाळा काढल्या. जगातील सर्व धर्म वाङ्मय अभ्यासासाठी उपलब्ध असेल, सर्व धर्मियांना आपल्या धर्माच्या धर्मगुरु होण्याचे प्रशिक्षण मिळेल असे ग्रंथालय

अडयार येथे स्थापण्यासाठी कर्नल ऑलकॉट यांनी खूप प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नातून अंडयार ओरिएंटल लायब्ररी स्थापन झाली. गुजरातमध्ये मुलींची शाळा स्थापन केली. १८८९ मध्ये मद्रास येथे 'हायस्कूल स्थापन' केले. आंध्रप्रदेशात मरपल्ले येथे 'बेझंट थिऑसॉफिकल कॉलेज' व 'बेझंट थिऑसॉफिकल हायस्कूल'ची स्थापना केली. स्त्रीया व अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या इ.स.१९२८ मध्ये बनारस येथे त्यांनी 'सेंट्रल हिंदू कॉलेज' स्थापन केले.

**सारांश -**

ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीने राजकीय, होमरूल चळवळ आणि स्वदेशी चळवळ लोकप्रिय करण्यात महत्वाची भूमिका बजावली. तसेच जनतेत राजकीय जागृती करण्यास हातभार लावला.

**५) सत्यशोधक समाज (Satyashodhak Samaj) -**

सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांवर आधारलेल्या प्रचलीत समाजव्यवस्थेत बदल घडवून आणावयाचा असेल तर या ठिकाणच्या अस्पृश्य व कनिष्ठ वर्गानी संघटीत होऊन ब्राम्हणी वर्चस्वाविरूध्द संघर्ष केला पाहिजे असे महात्मा फुले यांचे मत होते. अशा संघर्षाशिवाय कनिष्ठ जातींना त्याचे न्याय हक्क मिळणार नाहीत आणि अशा प्रकारचा संघर्ष करावयाचा असेल तर बहुजन समाजाची स्वत:ची संघटना हवी ही गरज ओळखून त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यामध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली महात्मा जोतिबा फुले हे या संघटनेचे अध्यक्ष होते. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हा या समाजाचा मुख्य उद्देश होता. सार्वजनिक सत्यधर्म व गुलामगिरी या दोन पुस्तकात सत्यशोधक समाजाविषयी त्यांनी आपले विचार मांडले आहेत. सत्यशोधक समाज ही महाराष्ट्रातील पहिली समता सुधारणेची चळवळ होती या समाजाची तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**सत्यशोधक समाजाची तत्वे -**

१. ईश्वर एक असून तो निर्गुण - निराकार आहे.
२. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.
३. सर्वशक्तीमान अशा परमेश्वराची भक्ती किंवा प्रार्थना करण्याचा प्रत्येक मानवाला अधिकार आहे.
४. परमेश्वराची भक्ती करण्यास कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. कोणत्याही व्यक्तीला पुरोहित किंवा गुरू यांच्या मध्यस्थीशिवाय आपल्या प्रिय परमेश्वराची

उपासना करता येते.

५. मानवाला जातीने नव्हे तर गुणाने श्रेष्ठत्व प्राप्त होते.

६. पुनर्जन्म, कर्मकांड, जप-तप इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत. तसेच त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणूकीचे कारण आहेत.

७. कोणताही धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नाही सर्व धर्मग्रंथांची निर्मिती मानवानेच केली आहे.

९. वरील तत्व मान्य असल्यास कोणासही समाजाचे सदस्य होता येते.

**सत्यशोधक समाजाची उद्दिष्ट्ये -**

सत्यशोधक समाजाने सभासदत्व समाजातील सर्व जातीच्या लोकांना खुले ठेवले होते. त्याची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. शुद्रातिशूद्र कनिष्ठ जातीच्या लोकांनी ब्राम्हण पुरोहितापासून होणारी पिळवणूक बंद पाडणे.

२. मानवामानवामधील उच्चनीच भेदाभेद दूर करून सामाजिक समतेचा पुरस्कार करणे

३. शुद्रातिशुद्रांना मानवी हक्काची पिळवणूक समजून देणे.

४. आपल्या हक्कासाठी झगडण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी निर्माण करणे

५. त्यांची ब्राम्हणी शास्त्रांच्या मानसीक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे

६. बहूजन समाजात वैचारिकता जागृत करणे.

**घ्यावी लागणारी शपथ -**

सत्यशोधक समाजाच्या प्रत्येक सभासदाला पुढील प्रमाणे शपथ घ्यावी लागत असे. "सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत. सबब ती माझी भांवडे आहेत. अशा बुध्दीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानसांधना करतेवेळी अगर धार्मिक विधीचे वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यानाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षीत करीन मी नेहमी राजनिष्ठेने वागेन. परमेश्वरास सत्यरुपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे."

**सत्यशोधक समाजाची वाटचाल -**

सत्यशोधक समाजाने आपली तत्त्वे व उद्दिष्टे यांना अनुकूल समाज सुधारणेची महाराष्ट्र व्यापी चळवळ सुरु केली. या चळवळीस सत्यशोधक चळवळ या नावाने



केले. स्त्री उध्दाराच

ओळखले जाते. या चळवळीचे तीन टप्पे आहेत.

१. इ.स. १८७३ ते १८९० हा कालखंड म्हणजे सत्यशोधक चळवळीचा पहिला टप्पा होय. पहिल्या टप्प्याचे नेतृत्व महात्मा फुले यांच्याकडे होते.

२. इ.स.१८९० ते १९१० हा कालखंड या चळवळीच्या दुसऱ्या टप्प्यात येईल. या काळात चळवळीत शिथिलता आली होती.

३. इ.स. १९११ नंतरचा कालखंड तिसरा टप्पा म्हणून ओळखला जातो. या काळात तिला पुन्हा महत्व प्राप्त झाले कारण शाहू महाराजांकडे नेतृत्व होते.

**सत्यशोधक समाजाचे कार्य -**

सत्यशोधक चळवळीचा पहिला टप्पा विशेष महत्वपूर्ण मानला जातो. या कालखंडातील चळवळीचे नेतृत्व व मार्गदर्शन व प्रेरणा महात्मा फुले यांच्याकडे होते. महाराष्ट्रात या समाजाच्या अनेक शाखा उघडण्यात आल्या. ज्या ठिकाणी शाखा स्थापन झाल्या त्या ठिकाणी दर आठवड्यात सभा घेण्यात येत असत. या सभामधून शुद्रजनसमाजाच्या प्रश्नांची चर्चा होत असे. कनिष्ठ जातीच्या लोकांच्या शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, धार्मिक विधी पुरोहिताशिवाय पार पाडणे, सामान्य लोकांना भूतखेते, जादूटोणा इत्यादी गोष्टीच्या भीतीपासून मदत करणे इ. चर्चा होत.

सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून म.फुले यांनी समाजात अन्याय, धर्माच्या नावावर चाललेले शोषण याविरूध्द आवाज उठविला. सत्यशोधक समाजाच्या वतीने पुरोहितांचे पौराहित्य नाकारून सत्यशोधक पद्धतीने २५ डिसेंबर १८८२ रोजी पहिला विवाह लावला पुढे ४ फेब्रुवारी १८८९ रोजी म. फुले यांनी आपला दत्तक पुत्र यशवंत याचा विवाह याच पद्धतीने संपन्न केला. हिंदू धर्मग्रंथाची निर्मिती येथील वरिष्ठ वर्गाने स्वत:च्या फायद्यासाठी केली असल्याचे त्यातील कथांवर विश्वास ठेवण्यात काही अर्थ नाही. असे त्यांचे सांगणे होते.

पुरोहितशाहीला त्यांनी विरोध करून पुरोहिताशिवाय सत्यशोधक पद्धतीने लग्ने लावली. सामाजिक समतेसाठी प्रदीर्घ लढा दिला. त्यांच्या या कार्यामुळे कनिष्ठ समाजात जागृती झाली.